# देशाचे आर्थिक धोरण, योजना व दुष्परिणाम

**प्रा. अनिल रविशंकर राऊत..**
एम.बी.पटेल कॉलेज देवरी.
ईमेल : arraut1988@gmail.com
मो.नं. : 8007922612

---

**सांराश :**

शासन देशाच्या विकासांसाठी वेगवेगळे उपाय करीत असते. सध्या शासनाने जो आर्थिक नियोजन केलेले आहे, तो कितपत योग्य आहे की, अयोग्य आहे. संशोधन लेखामधुन स्पष्ट करुन दाखवण्याचा प्रयत्न केले आहे, देशाचा विकास करण्यासाठी ज्या योजना आणलेल्या आहेत त्या योजनेने देशाला फायदा झाला आहे, काय ?त्या योजनेमुळे देशातील गरिबी दुर झाली काय ? योजनेने लोकांकडे पैसा मिळाल त्या पैशाचा वापर कशाप्रकारे करीत असतात. शासनाने योजनेमध्ये जो पैसा खर्च करीत असते. त्यामुळे देशामध्ये त्याचे दुष्परिणाम कशाप्रकारे झाले आहे. त्यामध्ये बेरोजगारी, महागाई, वित्तीय तुट, मध्ये वाढ झालेली आहे, संशोधनन लेखामुळे देशातील आर्थिक परिस्थितीत कशाप्रकारे सुधार करता येईल ह्या विषयी काही शिफारसी केल्या आहेत.

**Keyword :** शासनाचे उद्दिष्टे पूर्ण झाले नाही.

---


**प्रस्तावना :**

सरकार देशाचा विकास करण्यासाठी अर्थशास्त्राज्ञांनी सांगितल्या मतानुसार, देशाचा विकास करण्यासाठी मागणी ह्या घटाकावर जास्त भर दयावा लागेल देशामध्ये मागणी वाढणार नाही तर देशाचा विकास करता येणार नाही. सध्या २०१४ ते आतापर्यंत सरकारने त्यांचे आर्थिक नियोजन पूर्णपणे बदलविले आहे. आपण बघीतले आहे की, देशामधले सरकारी कर्मचाऱ्यांची भरतीच घेतले नाही. प्रत्येक सरकारी क्षेत्रामध्ये विभागामध्ये नोकर भरती पुर्णपणे बंद केली आहे शिक्षणावरील खर्च सुध्दा कमी केले म्हणजे सरकारचा ह्या क्षेत्रावर जेवढा पैसा खर्च होत होता तो पूर्णपणे बंद झाला.

सरकारने २०१४ पासुन एका घटाकाकडे लक्ष दिले आहे ते म्हणजे खालच्या स्थरावरील व्यक्ती, त्यामध्ये गरिब मजुर शेतकरी, यांच्यासाठी विविध योजनेद्वारे पैसा पुरवण्याचे काम करत आहे. २०१४ च्या अगोदरपासुन योजना चालु होत्या त्या योजनेमध्ये दिला जाणाऱ्या रक्कमेमध्ये १००% वाढ करुन दिले जात आहे आणि नव्याने योजना तयार केली आहेत त्या द्वारे प्रत्येक गरीब मजुर, शेतकरी यांचा विकास कशाप्राकारे करता येईल. परंतु जे आर्थिक नियोजन आहे काही प्रमाणात विफल ठरत आहे.

सरकारने जास्त पैसा छापण योग्य नाही कारण समाजामध्ये पैसा जास्त प्रमाणात आला की, तेजीला तोंड द्यावे लागत असते त्यासाठी सरकारचे जे उद्दिष्ट ये होते ते पूर्ण करण्यासाठी कोणतातरी खर्च कमी करावे लागते त्यासाठी त्यांनी सरकारी नोकर भरती बंद केली, शिक्षण क्षेत्रावरी खर्च कमी केला या खर्चाच्या बचतीमधुन सरकारने आपले उद्दिष्ट ये साकार करण्याचा प्रयत्न केला.

सरकारने आणलेल्या ज्या योजना आहेत त्या योग्य आहेत किंवा नाही हे स्पष्ट करुन दाखवित आहे त्या योजनेद्वारे समाजाला मिळालेले जो पैसे आहेत ते समाजाचा विकास करतात किंवा नाही तर सरकारचा उद्देश असा होता की, जे समाजमधील गरीब, शेतकरी, व मजुर व्यक्ती यांच्यापर्यंत सरळ पैसा जावा त्यापासुन गरीबी दुर होईल. शेतकऱ्यांचा आर्थिक विकास होईल व मजुरांना काम मिळुन त्यांच्या आर्थिक परिस्थितीमध्ये सुधार होईल. आणि देशामध्ये एक मोठा ग्राहक वर्ग मिळावा त्यामुळे जो व्यवसायीक चक्र आहे तो चालावा.




सरकार ने आर्थिक नियोजन केलेले आहे तो काही प्रमाणात चुकिचे ठरलेले आहे यामध्ये काही योजनांचा विश्लेषण करण्यात आले आहे.

**१) घरकुल योजना :**

देशामध्ये सर्व गरजु व्यक्तींना पक्के घर मिळावे म्हणुन ही योजना लागु करण्यात आली. ही योजना १९८५-१९८६ पासुन चालु करण्यात आली. यापासुन काही लोकांना रोजगार मिळाला आणि गरजु व्यक्तींना याचे पक्के घर बनले.

घरकुल योजनेमुळे काही लोकांना रोजगार मिळाला परंतु ह्या रोजगाराचा देशाचा विकासासाठी काही फायदा झालेला नाही, जे मजुर कामावर जात असत त्यांच्यामध्ये सुध्दा आर्थिक विषमता दिसुन आली. मजुरांना दिला जाणारा मजुरीचा मोबदला योग्य आह पण यामध्ये असे दिसुन आले की, ग्रामीण हो या शहरीभागातील मजुर हे त्यांना मिळालेल्या मजुरीमधुन आपल्या दैनंदिन गरजा मुलांचे शिक्षण, बचत, क्रयशक्ती दिसुन आलेली नाही, याचे कारण म्हणजे ज्या मजुरांना दारुची सवय आहे त्यांना मिळालेल्या मजुरीमधुन फक्त ते दारुची जास्त मागणी करतात आपल्या संसाराकडे कोणतेही लक्ष देत नाही,

ज्या मजुरांना दारुचे व्यसन नाही ते मजुर आपल्या मिळालेल्या मजुरीमधुन आपल घर चालवतातृ योग्य आपल्या घरच्या दैनंदिन गरजा पूर्ण करतात, मुलांना योग्य शिक्षणाची आवड निर्माण करतात. त्यांच्या कडे बचत सुध्दा झाली आणि त्या बचतीचा योग्य वापर सुध्दा करतात. त्यामध्ये शेतीसाठी लागणारा जो खर्च आहे तो आपल्या बचतीमधुन खर्च करतात, त्यांना कर्जातुन मुक्तता मिळाली. त्यामधुन काही मजुर त्या बचतीमधुन घर बनवण्यासाठी लागणाऱ्या साहित्याची खरेदी केली, कोणी वेगळ्या व्यवसायात पैसा गुंतवविला तर हे सर्व गोष्टी करु शकलेते म्हणजे फक्त दारुचे व्यसन नसलेल्या व्यक्तीनी , यामध्ये जे दारुचे व्यसन करत नाही त्यांचाच याठिकाणी विकास झाला, मजुरांमध्ये फक्त १०% व्यक्तीच दारुचे व्यसन न करणारे दिसत आहेत.

जे मजुर दारुचे व्यसन करत असतात त्यांचा घर तर पुर्णपणे त्यांच्या पत्नीवर अवलंबुन असतो आपल्या तुटपुंज्या मिळालेल्या मजुरी मधुन आपल्या घरातील दैनंदिन गरज मुलांच पालन-पोषन कसे बसे करीत असतो. योजनेचे उद्देश होते की गरीबांना रोजगार मिळावा आणि त्यांची गरीबी दुर व्हावी. व देशाचा विकास घडुन यावा.

परंतु असे काही दिसुन आलेला नाही ते फक्त दारुमुळे ज्या गरजु लोकांना घरकुल मिळाला आहे त्यांची सुध्दा परिस्थिती काही प्रमाणात वेगळी दिसुन येत आहे योजने द्वारे घरकुल बनविण्यासाठी जे पैसे मिळत असातत ते अशा महागाई मध्ये तर घराचा फोन्डेसन सुध्दा होत नाही. त्यासाठी पूर्ण् योग्य घर बनवायचा असेल तर आपल्या जवळील पैसे खर्च करावा लागत असते, म्हणजे लोकांकडील जेवढी बचती झालेली असते ते पूर्ण गुंतवावी लागत असते. आणि बाहेरुन सुध्दा कर्ज घ्यावा लागत असते. ह्या मध्ये घर बांधण्यासाठी वस्तुची खरेदी विक्री तर वाढली लोकांचे पक्के घर बनले पण ते कर्जबारी झाले. आपल्या मुलांचा लग्न सुध्दा दोन वर्ष थांबवल. अशी त्यांची परिस्थितील झाली त्यामध्ये तर दारु पिणाऱ्याना घरकुल योजनाचा लाभ मिळाला त्यांनी तर स्वत:घर बनवले नाही ते कोणत्याही गावातील एका ठेकेदाराला बनवण्यासाठी देत असतात. योजनेतुन पैसे मिळाले त्याच पैशामध्ये ठेकेदार आपली कमिशन काढुन उरलेल्या पैसामध्ये कमी गुणवत्तेचा घर बनवुन दिल.

घरकुल योजनेमधुन असे दिसुन येते की देशाचा विकासाचा उद्देश पूर्ण होतांना दिसन नाही. मला तर अस वाटते की, सरकार गुंतवणुक करत आहे. ज्यांना घरकुल मिळाला आहे त्यांच्या घर करामध्ये वाढ झालेली आहे गरिबांकडे गरजेच्या वस्तू व सेवा घेण्यासाठी पैसे राहत नाही. आणि कराचा बोजा आणखी वाढत आहे. त्यात आणखी महागाई वाढ होत आहे.जर सरकारने ह्या योजनेचा लाभ दरवर्षी कमित कमी लोकांना दिला, असा तर आर्थिक नियोजन बिगळलेले नसते. योजनेमुळे चलनवाढ दिसत आहे, घर बांधण्यासाठी लागणारा साहीत्याची किंमत गगणाला भिडले तरी पण लोकांना त्यांची मागणी करावा लागत आहे.

**२) PM किसान सम्मान योजना :**

या योजनेचा लाभ देशातील शेतकऱ्याना दिला जात असते. ह्या मध्ये आर्थिक साहयक निधि म्हणुन वार्षिक सहा हजार (६०००) रुपये रोख रक्कम २००० प्रत्येकी चार-चार महीन्यांनी दिले जात असते, अशी रोख रक्कम सरकारने शेतकऱ्यांने देणे योग्य पण आहे. आणि योग्य पण नाही. कोणाला काही काम न करता पैसे देणे योग्य नाही. ग्रामीण क्षेत्रामध्ये ज्या शेतकऱ्यांना २००० हजारांचा हप्ता ज्या दिवसी मिळत असते. त्या दिवसाला मदय प्रेमी खुपच मौज करत असतात. सर्व पैसे दारुमध्येच उडवतांना दिसत असतात. म्हणुन हे असे पैसे देणे आणि महागाई वाढवणे योग्य नाही. त्यामुळे वित्तीय तुट सुध्दा वाढत असते एप्रिल २०२१ ते फेब्रुवारी २०२२ ला १३,१६००० कोटी रुपयाची तुट झाली आहे. बरोजगारी तर खुपच वाढली आहे. असे पैसे देण बंद करावे.शेतकऱ्यांसाठी काही करायचे असेल तर त्याना खते कमी किमतीमध्ये उपलब्ध करुन दयावे.

देशाचा विकास करण्यासाठी अशा तुटपुंज्या पैशाने विकास करता येत नाही, असे पैसे मोफत देणे म्हणजे आपली सत्ता मजबुत करणे होय. आणि बेरोजगारी वाढवणे.

**३) शेतकऱ्यांना शेतमालाचे वाढीव किंमत आणि बोनस :**

ग्रामीण क्षेत्राचा विकास करण्यासाठी विविध मार्गानी शेवटच्या स्थरावर असलेला शेतकरी यांचा विकास कशाप्राकारे करात येईल त्या अनुसंगाने शेतकऱ्यांना त्यांचा शेतमालाचा योग्य हमी भाव त्यांना दिला आणि बोनस सुध्दा शेतकऱ्यांना वितरण करण्यात येत आहे, शेतकऱ्यांसाठी खुपच फायदयाचे केले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थिती मध्ये सुधार दिसत आहे. शेतकरी वर्षिक दोन फसल घेत असतात त्यामुळे त्याच्या विकासामध्ये सुधार होतांनी दिसत आहेतृ त्यामध्ये सुध्दा शेतकरी वेगवेगळे आहेत. ज्यांच्या कडे तिन-चार एकड जमिन आहे तेच आर्थिक विकासात समोर गेलेले आहेत आणि ह्यामध्ये असेही शेतकरी आहेत त्यांचा उत्पादन चांगल होतो

त्यांच्या मेहनतीचा मोबदला सुध्दा योग्य मिळाला परंतु त्यांना दारु व्यसनाची सवयअसल्यामुळे त्यांच्या विकास होऊ शकला नाही.

ग्रामीण क्षेत्रामध्ये ८०% शेतकरी हे दारुचे सेवन करणारे आहेत त्या अनुसंगाने फक्त २०% शेतकऱ्याच विकास होतांना दिसत आहे.

सरकार देशाचा विकास करण्यसाठी आणि गरीबी दुर करण्यासाठी कितिही उपाय- याजन आखेल पण ते व्यर्थ राहील. जेव्हा दारु बंद करेल तेव्हाच लोकांच्या सवयीपण सुटतील आणि देशातील प्रत्येक लोकांचा विकास दिसुन येईल. प्रत्येक व्यक्तीचा विकास म्हणजे देशाचा विकास समजला जात असतो. राहणीमाणाचा दर्जा सुधारत असतो.

**४) आमदार आणि खासदांराना पेंशन :**

जनतेने निवडुन दिलेल्या आमदार आणि खासदार प्रत्येकी पाच वर्ष आपल्या सेवेसी असतात, पाच वर्षे संपल्यानंतर त्यांना पेंशन मिळत असते. राजकारण म्हणजे सामन्य लोकांचा आता राहीलेला नाही. राजकारणामध्ये जे चांगले धनवान करोडपती असतात तेच व्यक्ती राजकारणामध्ये उतरत असात. त्यांच्याकडे खुप मेठमोठाले उद्योग त्यांच्या उत्पन्न भरपुर असेच व्यक्ती राजकारण करु शकतो, कारण आता राजकारणामध्ये कोणालाही पैसा शिवाय आमदार आणि खासदार होता येत नाही, साधा ग्राम पंचायतचा चुनाव लढता येत नाही आपल्या देशामध्ये जे आमदार खासदार आहेत त्यांची संपत्ती कोटयावधीची संपत्ती आहे त्यांचे मोठमोठे उद्योग आहेत उद्योगापसुन त्यांचा वार्षिक उत्पन्न चालुच असतो, राजकारण एक सेवा क्षेत्र म्हणुन बघितले जात नाही. देशामध्ये राजकारण आता योग्य गुंतवणुक म्हणुन बघितले जात आहे. आणि आपली देशामध्ये प्रतिष्ठा वाढावी हे सध्याचे राजकारणी लोकांचे उद्दिष्ट ये आहे देशाच्या विकासाबद्दल कोणीही विचार करीत नाही.देश स्वातंत्र्याच्या पुर्वी जे आपल्या देशाच्या स्वातंत्र्यासाठी देशाच्या हितासाठी आपले सर्व जीवन देशाच्या सेवेसाठी अर्पन केले असे "स्वातंत्र्यविर नेते" आपल्या स्वत:चा हित न बघता आपल्या देशातील लोकांचा हित बघितला त्यांच्याकडे तर नाही जास्त संपत्ती होती नाही त्यांचे वेगळे उद्योग होते नाही त्यांचे काही उत्पन्न सुरु होते तरी सुध्दा क्रांतीविरांनी देशाला स्वांतत्र्य मिळवुन देण्यासाठी सेवा दिल्याबद्दल कोणताही आर्थिक मोबदला न घेता स्वांतत्र्यासाठी लढले.

सध्या देशामध्ये जे आमदार आणि खासदार यांना सरकार दिढ ते दोन लाख रुपये मासिक मानधन देत असते, वेगवेगळया सुविधा मिळत असते, त्यामध्ये प्लेनचा प्रवास मोफत, वैदयकिय सुविधा मोफत. आमदार आणि खासदाराना काही सुविध उपलब्ध करुन देणे योग्य परंतु त्यांना महीन्याला दिढ ते दोन लाख मानधन देणे योग्य नाही आणि ते फक्त पाच वर्षे सेवा दिल्याबद्दल पेंशन लागु करणे योग्य नाही. जनतेचा पैसा योग्य कामत न लावता ते व्यर्थ कामामध्ये खर्च करीत आहे. अशा खर्चामुळे सरकार आर्थिक अडचणीमध्ये सापडत आहे, हे अशा व्यर्थ गोष्टीमुळे आज देशाची आर्थिक परिस्थती बिगाडलेली आहे बेराजगारीमध्ये वाढ, महागाई मध्ये वाढ भरपुर प्रमाणात दिसत आहे.

**५) ग्रामीण विकासाठी दिली जाणारी निधी :-**

वित्त आयोगामार्फत प्रत्येक वर्षे ग्रामीण स्थनिक स्वराज्य संस्थांना कोठयावधिचा निधी वाटल्या जात असते ह्या निधिचा उद्दिष्ट ग्रामीण विकासाला बळ मिळाव हे असते, हा निधी सर्व पंचायत राजसंस्थांना, जिल्हा परिषद, पंचायत समिती व गा्रमपंचायात यांना अनुकमे १०:१०:८० या प्रमाणात वितरीत कला जातो.

ग्रामीण क्षेत्रामध्ये ग्राम विकासाठी निधि दिली जात असते त्या निधिमुळे ग्रामीण क्षेत्राचा खुप विकास करता येत असतो. परंतु सध्या ग्रामपंचायत ही लोकांनी योग्य गुंतवणुक म्हणुन समजले जात आहे. निवडणुक लढवण्यासाठी थोडा पैसा खर्च करा आणि त्याचा परतावा म्हणुन पाच वर्षामध्ये जास्तीत जास्त पैसा कमवा अशी प्रत्येक व्यक्तींची धारणा झालेलीआहे, त्यासाठी देशाचा विकास हा थांबतो आहे. निधिचा योग्य वापर जर झाला असता तर ग्रामीण क्षेत्राचा विकास झालाच असता, ह्या निधीचा उपयोग कशाप्रकारे होईल त्यांचे नियोजन सरकारने आखले पाहिजे आणि ज्या कामासाठी तो निधि दिला आहे त्याचा वापर योग्य होतो किंवा नाही ह्या कडे लक्ष दिले पाहिजे हा निधी तर सध्या व्यर्थच समजत असतो.

संशोधनामध्ये शब्दाची मर्यादा असल्यामुळे दुसऱ्या योजनांचा विश्लेषण करु शकत नाही.

**निष्कर्ष :**

1) सरकारने जे सध्या आर्थिक नियोजन केले आहे ते विफल होतांना दिसत आहे.
2) देशाचा सर्वांगीण विकास होऊ शकलेला नाही.
3) देशामध्ये गरिबी दुर करता आली नाही.
4) देशामध्ये शिक्षीत बेरोजगारीमध्ये वाढ झाली आहे.
5) देशामध्ये वित्तीय तुट दिसत आहे.
6) देशामध्ये आपल्या पक्षाची सत्ता मजबुत करण्यासाठी हे आर्थिक नियोजन केलेले दिसुन येतो.
7) चुकीच्या आर्थिक नियोजनामुळे महागाईमध्ये वाढ झालेली आहे
8) देशामध्ये चलन फुगवटा घरकुल योजनेमुळे दिसुन येतो.

**शिफारसी :**

1) जनतेला मोफत पैसे न वाटता त्यांना रोजगार मिळवुन देणे हे गरजेचे आहे.
2) शेतकऱ्यांना पैसे मोफत न देता शेतीमध्ये लागणाऱ्या किटनासक, खते, इतर खर्चामध्ये कमी आणण्याचा प्रयत्न करणे.
3) महसुल गोळा करण्यासाठी जो कर वाढविलेला आहे तो कमी करणे मग आपोआप वस्तुच्या किंमती कमी होतात.
4) दारु बंदी केल्यावर देशाचा विकास होऊ शकतो.
5) योजनेचा लाभ देत असतांना किमान पध्दतीचा अवलंब करावा.

**संदर्भ ग्रंथसूची :**


- NDTV-Prime Time – June 5, 2020 Speaking to Ravish Kumar, Noble Lauzeate Professor Abhijit Bumerjee
- https://rdd.maharashtra.gov.in
- https://Pmkisan.gov.in
- लोकमत न्युज नेटवर्क: December 29, 2021.
- लोकमत न्युज नेटवर्क : February 24, 2019.
- देशोन्नती गोंदिया Live : April 18, 2022.